जा.क्र.2020/पुरवठा/प्रशा-1/कावी
जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा) जालना
दिनांक :-27.07.2020

प्रति,
तहसिलदार जालना/ बदनापूर/ भोकरदन/ जाफ्राबाद/ परतूर/ मंठा/ अंबड/ घनसावंगी जि.जालना.

**विषय :-** **प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी माहे ऑगस्ट-2020 चे प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे गहु पुरवठा करणे बाबत.**

उपरोक्त विषयी **माहे ऑगस्ट-2020** साठी शासनाकडून प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना अंतर्गत **प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे** पात्र लाभार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे तालुकानिहाय गोदामातील शिललक साठा व मागणी विचारात घेवून अंत्योदय गहु या योजनेचे नियतन देण्यात येत आहे. तहसिलदार यांनी प्रति लाभार्थी योजनेचे उपलब्ध साठयानुसार वितरण करावे.

| अ. क्र | तालुक्याचे / शासकीय गोदामाचे नांव | लाभार्थी संख्या | क्वांटम (किलो) प्रति लाभार्थी | देय नियतन ( क्विंटल मध्ये ) |
|---|---|---|---|---|
| | | | गहू | **गहु डि.ओ.क्र.8798 दि. 25.07.2020** |
| | जालना (शहर) | 132194 | 03 | 3965 |
| 1 | जालना (ग्रामीण) | 171003 | 03 | 5130 |
| 2 | जालना टी.एफ (बदनापूरसाठी) | 112787 | 03 | 3383 |
| 3 | भोकरदन | 221248 | 03 | 6637 |
| 4 | जाफ्राबाद | 119488 | 03 | 3584 |
| 5 | परतुर | 120412 | 03 | 3612 |
| 6 | मंठा | 122307 | 03 | 3669 |
| 7 | अंबड | 178834 | 03 | 5365 |
| 8 | घनसावंगी | 154397 | 03 | 4631 |
| | **एकुण** | **1332670** | | **39976** |

शासनाने ठरवून दिलेल्या देय नियतणाप्रमाणेच उपलब्धतेनुसार अन्नधान्य वितरीत करावे. सदर धान्य लक्ष निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यपध्दतीप्रमाणे वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी. कार्डधारकास स्वस्तधान्य दुकानाच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप होत असल्याची खातरजमा करण्यात यावी. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, 2001 मधील तरतुदीनुसार उपयोगीता प्रमाणपत्र नियमीत सादर करण्यात यावे.

**मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने**

**जिल्हा पुरवठा अधिकारी जालना**

**प्रतिलीपी**

1. मा.उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2. मा.श्री.रावसाहेब दानवे (पाटील) खासदार जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
3. मा.श्री.बबनराव लोणीकर आमदार ९९-परतूर विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
4. मा.श्री.राजेश टोपे आमदार १००-घनसावंगी विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
5. मा.श्री.कैलास गोरंटयाल आमदार १०१-जालना विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
6. मा.श्री.नारायण कुचे आमदार १०२-बदनापूर विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
7. मा.श्री.संतोष दानवे आमदार १०३-भोकरदन विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
8. श्री.पी.के.पिंपळे अ.का. धान्य वाहतूक प्रतिनिधी यांना देवून कळविण्यात येते की, त्यांनी अन्न महामंडळाच्या गोदामातून गहु स्विकारतांना शासनाच्या निर्देशानुसार संयुक्तपणे नमुने घेऊन धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची **दिनांक 31.07.2020** पुर्वी उचल करावी.या जिल्हयाचे वाहतुक गुत्तेदाराचे लेखी स्वरुपात प्राधिकृत केलेल्या ट्रकमधूनच वाहतूक देण्यात यावी.
9. गोदामपाल जालना (ए.आर)/जालना(टी.एफ)बदनापूरसाठी/भोकरदन/जाफ्राबाद/परतुर/मंठा/अंबड/घनसावंगी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
10. मे.परफेक्ट रोडलाईन्स, अन्नधान्य वाहतूक कंत्राटदार,जि.जालना पत्ता- सिटी प्लाझा, पहिला मजला, कचेरी रोड, जूना जालना यांना देवुन कळविण्यात येते की, आपण उक्त नमुद केलेले अन्नधान्य **दिनांक 31.07.2020** पुर्वी जालना शहरातील रास्तभाव दुकानांना आपणाकडील मा.जिल्हाधिकारी जालना यांची मान्यता दिलेल्या ट्रक मधुनच वाहतुक करावे. धान्य व्यपगत झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गतच्या धान्याची वाहतुक करतांना वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच वरील प्रमाणे देण्यात आलेल्या नियतनामध्ये कमी/ अधीक धान्य पाठवु नये. याची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.
11. उप व्यवस्थापक अन्न महामंडळ जालना भोकरदन रोड/बोरखेडी जि.जालना यांना डी.ओ.चे दोन प्रती देवून कळविण्यात येते की श्री.पी.के.पिंपळे अ.का. धान्य वाहतूक प्रतिनिधी यांना धान्य उचलीचे कामासाठी आदेशीत करण्यात येत आहे. तरी आमचे प्रतिनिधीस धान्याची डिलेव्हरी दयावी. डिलेव्हरी देतांना धंवट व फाटकी पोती देऊ नयेत तसेच डी.ओ. निरंक होताच त्याची एक प्रत या कार्यालयास देण्यात यावी.
12. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय जालना याना देवुन सुचित करण्यात येते की जालनाच्या बेबसाईटवर सदर आदेश प्रदर्शित करण्यात यावा.
13. जिल्हा माहीती अधिकारी जालना यांना प्रसिध्दीसाठी देण्यात येते.
14. नायब तहसिलदार पुरवठा ,पुरवठा निरीक्षक-1 व 2 यांना देवुन सुचित करण्यात येते की नियतन उचल वाटपावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

**जिल्हा पुरवठा अधिकारी जालना**